कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे फॅक्स मशीन खरेदी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. एमआयएस १०९५/६[५३]/पीआरएस-२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १४ जून १९९५.

वाचावे : कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. डीएसए/१४२२७/१९९५/कक्ष-३, दिनांक २५.४.१९९५.

निर्णय : कारागृह विभाग सुरक्षा विभाग असून महाराष्ट्र राज्यातील कारागृहामार्फत मुख्यालयाशी तसेच शासनाशी अत्यंत तातडीचे संदेश सध्या फोन, बिनतारी संदेश, तार या माध्यमाद्वारे देण्यात येतात. कारागृह विभागातील बंद्यांची माहिती तसेच इतर सुरक्षा विषयक बाबींवर कारागृहांना मुख्यालय / शासनाची मंजुरी, आदेश तातडीने घेणे जरुरीचे असते. राज्य/केंद्र शासनाला व मुख्यालयाला महत्वाच्या बाबींवर त्वरीत माहिती हवी असते. तार, वायरलेस/ दूरध्वनीवरून मागविलेली माहिती तसेच प्राप्त होणा-या माहितीत चूक होण्याचाही संभव असतो. या परिस्थितीचा विचार करून या आदेशाद्वारे कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात एक फॅक्स मशीन विहित पध्दतीने खरेदी करण्याच्या अटीवर शासन मंजुरी देत आहे.

२. यावर होणारा खर्च मागणी क्रमांक ७, २०५६-तुरुंग-००१ कारागृह महानिरीक्षणालय-३१ हत्यारे व [illegible] अंयत्र [२०५६००२६] या शीर्षाखाली टाकण्यात यावा व सदरहू खर्च सन १९९५-९६ च्या मंजूर तरतुदीतून भागवावा.

३. हे आदेश वित्त विभाग यांच्या क्रमांक सीआर २३३/९५/व्यय-८, दिनांक २२.५.१९९५ च्या अनौपचारिक संदर्भान्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[श्री. य. सोनवणे]
अवर सचिव, गृह विभाग,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
कारागृह उपमहानिरीक्षक [मुख्यालय], महाराष्ट्र राज्य, पुणे,
महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई,
महालेखापाल-१ [लेखा परिक्षा], मुंबई.
वित्त विभाग, व्यय-८,
गृह विभाग- बीयुडी-१,
~~xxxxxxxxx~~ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
निवड नस्ती [पीआरएस-२,
...